पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- ०३/०८/२०२०

## पोमके धोडराज पंचक्रोशीतील नागरिकांचा नक्षलविरोधी जनआक्रोश

- ***जनआक्रोश रॅली काढुन नागरिकांनी व्यक्त केल्या नक्षलविरोधी भावना***
- ***धोडराज मुख्य चौकात नक्षलवादाचा प्रतिकात्मक पुतळा जाळुन केला नक्षल सप्ताहाचा विरोध***

*उपविभाग भामरागड अंतर्गत पोमके धोडराज पंचक्रोशीतील मौजा भटपार, हिंदेवाडा, इरपनार, धोडराज, पिटेकसा, रणीपोदुर, दर्बा अशा अनेक गावातील नागरिकांनी एकत्र येत, नक्षलवादयांनी दि.२८ जुलै ते ३ ऑगस्ट रोजीपर्यंत नागरिकांना नक्षलसप्ताह पाळण्यास केलेल्या आवाहनांचा 'जनआक्रोश रॅली ' काढुन तीव्र निषेध केला. यावेळी मौजा धोडराज येथील मुख्य चौकात नागरिकांनी नक्षलवादाचा प्रतिकात्मक पुतळा जाळुन आपल्या मनातील संतप्त भावना व्यक्त केल्या.*

*एकीकडे नक्षलवादी आपणच येथील जनतेचे रक्षक असल्याचे भासवत आपण सामान्य आदिवासी जनतेसाठी लढत असल्याचा आव आणतात. तर दुसरीकडे नक्षलवादी दुर्गम भागातील नागरिकांना बंदुकीचा धाक दाखवत नेहमीच स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी त्यांचा वापर करत असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे. नक्षल सप्ताहाच्या नावाखाली नक्षलवादी गडचिरोली जिल्हयातील जनतेला वेठीस धरून बळजबरीने त्यांना बंद पाळण्यासाठी त्यांच्यावर बंदुकीचा धाक दाखवुन बंद पाळण्यास भाग पाडतात. त्याचबरोबर गरिब आदिवासी बांधवांकडुन धान्य व पैसे उकळतात. नक्षलवादयांचा हा दुटप्पीपणा मौजा धोडराज पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी जगासमोर आणत आम्ही नक्षलवादास विरोध करत असल्याचे म्हटले.*

*यावेळी नक्षलवादयांनी जनतेमध्ये दहशत पसरविण्यासाठी दिनांक ०७/१०/२०१८ रोजी मौजा इरपनार येथील रहीवासी महिला, उच्चशिक्षीत विदयार्थीनी बेबी गंगा मडावी हीचा व दिनांक-१०-०७-२०२० रोजी मुन्शी देवू ताडो याचा*

नक्षलवादयांनी खुन केला होता. या बाबींचा निषेध करण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी तसेच मृतकांच्या नातेवाईकांनी एकत्र येत नक्षलवादयांच्या हिंसाचाराला कंटाळुन मौजा हिंदेवाडा ते धोडराज रोडवरील, धोडराज मुख्यचौकापर्यंत नक्षलविरोधी जनआक्रोश रॅली काढुन नक्षलवादयांच्या हिंसक कृत्याचा तीव्र निषेध केला. दरम्यान धोडराज मुख्यचौकातील बेबी मडावीच्या स्मारकाची नागरिकांनी पुजा करण्यात आली तसेच धोडराज येथील मुख्य चौकात नक्षलवादयांचा पुतळा जाळुन 'बेबी मडावी अमर रहे, नक्षलवाद मुर्दाबाद' अशा घोषणा देवुन नागरिकांनी आपल्या संतप्त भावनांना वाट मोकळी करुन देत नक्षलवादयांच्या सप्ताहाचा जाहीर निषेध केला.

मौजा धोडराज पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरुन नक्षलविरोधी जनआक्रोश रॅली काढुन तसेच नक्षलवादयांचा पुतळा जाळुन नक्षलवाद्यांचा खरा चेहरा जगासमोर आणणाऱ्या ग्रामस्थांचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी कौतुक करुन गडचिरोली पोलीस दल जनतेच्या नेहमी पाठीशी राहील असे आवाहन केले.





